नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २५/०७/२०२६ (शनिवार)**

---

## गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद

## ०७ गोवंश जनावरांची सुटका, उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :– दिनांक २४/०७/२०२६ रोजी उमरेड पोलीस अवैध धंदयांवर कारवाई कामे पेट्रोलींग करीत असताना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांना एक संशयित मॅक्स बोलेरो पिकअप गाडी क्र. एम. एच–३३/टि – ४८७२ येताना दिसली. पोलीसांनी वाहन थांबवुन तपासणी केली असता चालक नामे हारून बशीर सैयद, वय ४८ वर्ष, रा. धनगवल बाबा नगर, खरबी रोड नागपुर हा मिळुन आला. पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ०७ गोवंश जनावरे (०५ कालवड, ०२ गाई) असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून मॅक्स बोलेरो पिकअप गाडी क्र. एम. एच–३३/टि – ४८७२ किंमती ५,००,०००/– रूपये आणि ०७ गोवंश जनावरे किंमती ४५,०००/– रूपये असा एकुण किंमती ५,४५,०००/– रूपयाचा मुददेमाल जप्त केला.

नमुद प्रकरणी आरोपी चालक नामे हारून बशीर सैयद, वय ४८ वर्ष, रा. धनगवल बाबा नगर, खरबी रोड नागपुर याच्या विरूध्द पोलीस स्टेशन उमरेड येथे कलम ११(१), (क), (फ), (ह) प्राण्यांचा छळ अधिनियम १९६०, सहकलम ५ (अ), ९ महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम १९९५, सहकलम १३०/१७७ मोटार वाहन कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे. **आरोपी चालकास अटक करण्यात आली आहे.**

# प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद, १६ लाख १० हजार रूपयांचा मूद्देमाल जप्त नरखेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन नरखेड** :— दिनांक २३/०७/२०२६ रोजी नरखेड पोलीस पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, महाराष्ट्रात प्रतिबंध असलेला सुगंधित तंबाखुची अवैधरित्या वाहतुक केली जात आहे. अशी माहीती प्राप्त होताच मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण आणि श्री. पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी काटोल विभाग यांच्या मार्गदर्शनात नरखेड पोलीसांनी सापळा रचत कारवाई केली असता आरोपी १) आशिक पठान अकबर खान, वय ३८ वर्ष, रा. प्लॉट नं. २६, आनंद नगर फुलफैल जवळ, ता. जि. वर्धा २) रूपेश राजकुमार संत (कुनगुलवार), वय ३६ वर्ष, रा. प्लॉट नं. ६४, श्रीकृष्ण कॉलनी, कारला चौक वर्धा हे चारचाकी अलकाजर वाहन क्र. एम. एच—३२/ए एस—६७२० सह मिळुन आले. पंचासमक्ष वाहनाची झडती घेतली असता त्याचेजवळ महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला. **पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष एकुण वजन २२० किलोग्रॅम प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु किंमती १,१०,०००/— रूपये, चारचाकी अलकाजर वाहन क्र. एम. एच—३२/ए एस—६७२० किंमती १५,००,०००/—रूपये असा एकुण १६,१०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलीसांच्या तपासात सदर वाहनाचे मालक महिला आरोपी असल्याचे निष्पन्न झाले.**

नमुद आरोपीने सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उत्पादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा केला होता. **आरोपी १) आशिक पठान अकबर खान, वय ३८ वर्ष, रा. प्लॉट नं. २६, आनंद नगर फुलफैल जवळ, ति. वर्धा २) रूपेश राजकुमार संत कुनगुलवार, वय ३६ वर्ष ३) महिला आरोपी** यांचेविरूद्ध पोस्टे नरखेड येथे अन्न सुरक्षा आणि मानके अधि. २००६ सहकलम १२३, २७४, २७५, २२३ भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

# रामटेक येथे छत्रपती शिवाजी महाराज,महाराजस्व समाधान शिबीरात नागपुर ग्रामीण पोलीस दलातर्फे सायबर गुन्हे,वाहतुक नियम, महीला तक्रार निवारण तसेच विविध पोलीस/आपत्कालीन हेल्पलाईन बाबत करण्यात आली जनजागृती

**मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक २५/०७/२०२६ रोजी श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी ,रामटेक उपविभाग आणि पोलीस निरीक्षक ,श्री राजेशकुमार थोरात, प्रभारी अधिकारी, रामटेक पोलीस स्टेशन यांच्या नेतृत्वात रामटेक पोलीस स्टेशन आणि सायबर पोलीस स्टेशन, नागपुर ग्रामीण यांनी रामटेक येथील छत्रपती शिवाजी महाराज,महाराजस्व समाधान शिबीरात उपस्थित राहुन नागरिकाना माहीती देवुन जनजागृती केली.**

आज दिनांक २५/०७/२०२६ रोजी महाराष्ट्र शासन महसुल व वन विभागतर्फे आनंदी सेलिब्रेशन रामटेक येथे छत्रपती शिवाजी महाराज, महाराजस्व समाधान शिबीर आयोजित करण्यात आले होते . विविध शासकीय कार्यालया मार्फत स्टॉल लावुन नागरिकांना शासकीय योजनांबाबत माहीती देण्यात आली. नागपुर ग्रामीण पोलीस दलातर्फे रामटेक पोलीस स्टेशन आणि सायबर पोलीस स्टेशन, नागपुर ग्रामीण यांनी शिबीरात उपस्थित नागरिकांना माहीती देवुन जनजागृती केली. यामध्ये सायबर गुन्हयाबाबत जगजागृती करून हेल्प लाईन क्रमांक १९३०, १९४५, बेवसाईट बलइमतबतपउमणहवअण्पद बाबत माहीती तसेच सायबर गुन्हयांबाबत जनजागृती पत्रिका वाटुन महीती दिली. महीलांच्या सुरक्षेकरीता हेल्पलाईन क्र १८१/१०९१,चाईल्ड हेल्प लाईन क्र १०९८, पोलीस हेल्प लाईन क्र ११२, जेष्ठ नागरिक सुरक्षा हेल्प लाईन क्र १४५६७ याबाबत माहीती, वाहतुकीचे नियम, रस्ता सुरक्षा नियम तसेच विविध उपयुक्त मुद्दयांवर जनजागृती करण्यात आली.


आधार कार्ड
नोंदणी
छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर
पोलीस स्टेशन रामटेक


आधार कार्ड
पोलीस स्टेशन रामटेक

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०७ गुन्हे नोंद

दिनांक २४/०७/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, विदेशी दारू असा एकुण ९६००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०७ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे 1) अमित लक्ष्मणराव भोंडेकर, रा. पुसला, ता. वरूड, जि. अमरावती २) सदराम शंकर धुर्वे, रा. सिंसावडी काटोल, जि. नागपुर यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड येथे** आरोपी १) सुरेश सतोष राजपुत, वय ४७ वर्ष, रा. राजुरवाडी २) राहुल रामलु वलचेटवार, वय ४१ वर्ष, रा. चंद्रमणी नगर, परदेशी लाईन नागपुर यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी अनिल प्रल्हद मेश्राम, वय ३७ वर्ष, रा. सावरखंडा, ता. कुही, जि. नागपूर याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन पाचगाव येथे** आरोपी प्रभु दयाराम उईके, वय ४० वर्ष, रा. वार्ड क्र. २ याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन देवलापार येथे महिला** आरोपी हिचेवर ०१ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण ४३२० मिली विदेशी दारू, ३६ लिटर मोहाफुल दारू असा एकुण ९,६००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

# नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७२६ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक २५/०७/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील २३ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७२६ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४५ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २३ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २८ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १४ आरोपी अशा एकुण १३७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ५० आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३४ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे १४ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी अशा एकुण १२८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३५ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २१ आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १८ आरोपी अशा एकुण ७४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३३ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३३ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २४ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २८ आरोपी अशा एकुण ११८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ६० आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५५ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३३ आरोपी अशा एकुण १७५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.






महाराष्ट्र पोलीस
पोलीस स्टेशन खापा
दूरध्वनी क्र. : 07113-286122
जि. नागपूर (ग्रा.)
RR KĀBEL
Shot on OnePlus


पोलीस स्टेशन
पारशिवनी
फोन नं. : ०७१०२-२२५१२३







मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने